म. ग्र. स. ठाणे
वय काव्य
नं. 2033

# ...द्यान

द्वितीय गुच्छ.

मालाकार.

**विश्वनाथ नारायण वाड.**

मुद्रक

**लक्ष्मण रामचंद्र करमरकर.**

... नासिक.

REFBK-0001693
REFBK-0001693

किंमत दीड आणा.

# प्रस्तावना.

१५५३

प्रिय वाचकांच्या भेटीचा आज द्वितीय योग आल्यानें मला अत्यंत समाधान वाटत आहे. माझ्या प्रथम भागावर कविवर्य रे. रा. **टिळक**, कविमित्र रा. रा. ' **कुवलयानंद** ' B. A. '**मोरेश्वर**', सखाराम महिपत कुळकर्णी हेडमास्तर, प्रोफेसर डॉ. **गुणे** M. A P.H D. प्रोफेसर **हरि रामचंद्र दिवेकर** M. A. तसेंच '**ज्ञानप्रकाशकार**' वगैरेंनीं आपले अनुकूल अभिप्राय व्यक्त करून मला ऋणी केलें. अखेर माझी इच्छा ही कीं, सहृदय रसिकजन ही सेवा गोड करून घेवोत व मला माझ्या व्यासंगांत साह्य करोत.

नासिक रा. ब.
वाड यांचा वाडा
१-२-१९

सर्वांचा नम्र,
**वि. ना. वाड.**

# समर्पण.

सापत्न माता जरि नाम लोकीं ।
पुत्राहुनि प्रेम जिचें विलोकीं ॥
ऐशी सती जी ' यमुना ' तियेला ।
प्रेमें पहा गुच्छ समर्पियेला ॥ १ ॥
पिता-वियोगें मज शैशवांत ।
दुर्दैव माझें करितें अनाथ ॥
अशा प्रसंगीं बहु भक्तिनें जी ।
झटे सुसंवर्धन पुण्य-काजीं ॥ २ ॥
दावी सदा शील-महत्व मातें ।
मोजी न जी आपुलिया श्रमातें ॥
माता अशी निर्मल देवरूप ।
वाहीन हें तीस " द्वितीय पुष्प " ॥३॥

REFBK-0001693
REFBK-0001693
दा. क्र. ७६९

# माझा बाळ

## पद.

[ आजि शेवटचा लाभचि हा ममतेचा ]

तूं नीज सुखें नीज तान्हुल्या बाळा ।
खेळाचा किति तुज चाळा ॥
त्या ईशानें रक्षावें लडिवाळा ।
हलविशी हृदय वेल्हाळा ॥
चालः—तुज जगतांतिल व्यवहार ।
कोठोनि विदित होणार ? ।
तूं आनंदाचें द्वार ।
प्रभुरायारे नीट करो प्रतिपाळा ॥खेळाचा॥ १
कापट्य जनमनीं आहे ।
आझास दाखले बा हे ।
तूं नको भुलूं ह्या मोहें ।
तुज शांति सती अक्षय घालिल माळा ।खे.। २

निर्भयता दिसते वदनीं ।
गालावरि कांती दोन्हीं ।
रत्नासम शोभसि सदनीं ।
मज ऐकूंदें सुंदर-घुंगुर वाळा ॥ खे. ॥ ३ ॥
बाळाची बघुनी लीला ।
निर्वैर तशा वृत्तीला ।
शांतीचा अनुभव आला ।
मग विसरें मी दर्पण जगिचा काळा ॥खे. ४ ॥

# माझें-वेड.

## पद.

( सगुण गुण-माया )

वेडा बनलो, जनत्रास त्यजाया सजलो ।
**चालः**-कृत्रिमता मज विषसम गमली ।
रूढि बेडीनें जनता भ्रमली ।
सांगुनियां परि वाणी श्रमली ।
सत्पथीं आलों । परमेश कृपेनें धालों । १ ।वेडा ।

निसर्ग निर्मित सृष्टी सगळी ।
रविशशि तरु खग मित्रमंडळी ।
सागर सरिता तशी निराळी ।
प्रेमें भुलल्लों । दृढ अंकित होउनि रमलों ।२।वे.

त्यांचा स्नेह गमे सुखकारी ।
सहवासें मन हो न विकारी ।
शांति-सौख्य लाभेल अंतरीं ।
प्रभुपदां स्मरलों । जन दृष्टि मुक्त मीं झालों ।३

प्रभातकालीं छटा रवीची ।
तप्तसुवर्णा दिसते प्राची ।
ध्यावी उपमा सांग कशाची ? ।
दर्शनें धालों । मजला मीं विसरुनि गेलों।४। वे.

तरु देती पांथस्था छाया ।
पिकगण गातो श्रमा हराया ।
रहस्य ह्यांतिल सोडि न वायां ।
तत्व हें शिकलों । सुखनिधींत बुडुनी गेलों ।५।

देवा दाविसि दृश्यें विविध ।
मानव घे न तयांतिल बोध ।
परोपकारीं सौख्य अगाध ।
गोष्ट ही शिकलों । प्रभुपदारविंदा विकलो ।६।

---

# स्वाशय-निवेदन.

प्रभो ! परम मंगला,
तुजसि भक्तिनें वंदिलें ।
मनांतिल विचार हे,
कवन गुंफुनी वाहिले ॥
जगांत दिसतो प्रभो,
अनय माजला केवळ ।
अनाथ बहु भोगिती,
प्रबल जे तयांचा छळ ॥ १ ॥

ठाणे

गमें सकल प्राणियां,
सुख हवें सदा सर्वदां ।
परंतु व्यवहारि त्या,
भिवविती किती आपदा ॥

निवारुनि तयां तुह्मीं,
विसरुनी प्रमादाप्रती ।
विनंति परिसा तरी,
कवि मुका बसे संप्रती ॥ २ ॥

किती कुशल धूर्त ते,
कपटि भोळियां सज्जनां ।
कसें फसविती नसे,
द्रव मुळी तयांच्या मना ॥

कळेल कधि हें तुला,
मज विचार ऐसा पडे ।
उपेक्षिसि वृथा तरी,
व्यसन-सागरीं सांपडे ॥ ३ ॥

जरी कथिति शाहणे,
मज सुतत्व वेदांतिचें ।
ममत्व कुठुनी सुटे,
वद प्रभो ! अह्मां दोहिंचें ॥
विचार करितां असा,
भ्रमविते मना आस ही ।
तिच्यास्तव बरा ह्मणे;
मनुज येथला त्रास ही ॥ ४ ॥
करोनि पठणा महा,
जप तसें अनुष्ठान तें :
परी न हृदयांत या,
सुखद शांतता नांदते ॥
दिसेल तुजला प्रभो,
हितकरा अशी सोय ती ।
मला त्वरित दाखवी,
भ्रमित होय माझी मती ॥ ५ ॥

कितीक ह्मणती मला,
" फुकट काळ कां वेंचला ? ।
धनार्जन करावया,
करुं अनेक कावे चला ! ॥
कशास बहु वाचिली,
विविध जातिचीं पुस्तकें ? ॥
मिळें तुजसि काय तें ?
वद तयांतलें जें टिकें " ॥ ६ ॥

जनीं ह्मणाति सभ्यता,
मज दिसे लबाडी खरी ।
दुजास फसवावया,
खरचिती सदा वैखरी ॥
उदार बहु थोर तो,
जरि असे कुणी मानव ।
तयाहि अवमानिती,
कपटि येथले दानव ॥ ७ ॥

जरी चहुंकडे मला,
दिसतसें निराशा सदा ।
प्रभो ! मजसि वाटतें,
निज सुशील ही संपदा ॥
हिच्यावरि तरेन मी,
बिकट संसृती-सागर ।
मला मग दिसें खरें,
सुखसमृद्धिचें आगर ॥ ८ ॥
असा भरंवसा असे,
परि कधी उठे संशय ।
ह्मणोनि कवि प्रार्थितों,
प्रभु निवारि रे तद्भय ॥
तुझ्या चरण-दर्शना,
मजसि ने विभो ईश्वरा ।
कृपा करुनि विश्व हें,
झणि सुमंगळा उद्धरा ॥ ९ ॥

---

दा॰क्र. १६९३.

# व्यर्थ नरदेह.

स्वार्थे मनाला जणुं वेड लागें ।
द्रव्यार्जनीं अक्षय देह वागे ॥
दुजा नराची क्षिति ज्यास नाहीं ।
पशूहुनी नीच मनुष्य-देहीं ॥ १ ॥
जो भूषवी देह सुभूषणांनीं ।
मी शाहणा, थोर मनांत मानी ॥
दुःखी निराधार बघे न कांहीं ।
पशूहुनी नीच मनुष्य-देहीं ॥ २ ॥
दुःशब्द योगें दुखवी परास ।
हें कार्य कांहीं न गमें जयास ॥
अत्यादरें कोण अशास पाही ?
पशूहूनी नीच मनुष्य देहीं ॥ ३ ॥

काया तशी वाणिहि द्रव्य ज्याचें ।
परोपकारार्थ न वेंचण्याचें ॥
धरित्रिला भार बनोनि राही ।
पशूहुनी नीच मनुष्य-देही ॥ ४ ॥

---

# अस्तमान.

बहू मंगला संधि वाटे कवीला ।
निघे अस्तमानीं यदा देखण्याला ॥
वनीं जाउनी तो उभा राहि मोदें ।
तदा मानसीं शांति-साम्राज्य नांदें ।१।
।दिसे सूर्य तो रक्तिमायुक्त जेव्हां ।
कवीच्या मनीं दाटला गाढ प्रेमा ॥
प्रभो ! केवढें दृश्य हें भव्य आहे ।
वदे जो तया, सत्पथीं वृत्ति राहे ।२।

जयानें असें कृत्य अद्भूत केलें ।
तया शोधवीं चित्त व्हावें भुकेलें ॥
सदा ग्रामवासी; जिणें व्यर्थ वायां! ।
असे मूर्ख आह्मी अहो! देवराया ।३।
किती सृष्टिमाजी सुसौन्दर्य आहे ।
नरा! नीट तें जाउनी मात्र पाहे ॥
तुझ्या बालकां ज्ञान द्यावें प्रभो तूं ।
असा अंतरीं राहिला शुद्ध हेतू ॥४॥

---

# एक भिकारी.

दिसे मला एक दिनीं भिकारी ।
जो राहिला होउनि दीन दारीं ॥
विचारिलें वृत्त यदा तयाला ।
निश्वासुनी दीर्घ तदा ह्मणाला ॥१॥

थंडीनें ह्या क्लेश होतात भारी ।
जीर्णा वस्त्रा देउनी साह्यकारी ॥
व्हावें ऐशी एक आहे विनंति ।
देवें द्यावी आपणा सौख्य शांति ॥२॥
ह्या भूलोकीं भिन्न भिन्न स्वभाव ।
पाहीले मी जाणतों तत्प्रभाव ॥
कोणी दीना साह्य देतात फार ।
कोणी आणी त्यावरी दुःखभार ॥३॥
माझे सारे आप्त प्लेगांत गेले ।
देवानें ह्या एकटें टाकियेलें ॥
इच्छा त्याची जी असे तीस मान ।
देतो मानी दुःख सौख्या समान ॥४॥

त्या वेळीं जरि जीर्ण वस्त्र नव्हतें,
कांहींच माझ्या घरीं ।
आणोनी म्हणि त्यास एक दिधली,
सप्रेम मी भाकरी ॥

झाला तुष्ट तयें; पहा मग मळा,
आशिर्वचा बोलला ।
तुम्हाला सुख आयु देइल प्रभू,
प्रार्थीन त्या मंगळा ॥ ५ ॥

गेला ऐसें बोलुनी तो भिकारी ।
माझें झालें चित्त तेव्हां विकारी ॥
दारिद्र्यानें गांजलें लोक फार ।
ह्या संबंधी चालले मद्विचार ॥ ६ ॥
देवा येथें एवढा भेद काय ? ।
केलें कां हो ह्या जगां निःसहाय ॥
उद्योगानें भाकरी ही मिळेना ।
ऐशी आहे दीन लोकांत दैना ॥७॥
देवा त्यांची कींव आतां करावी ।
भो विश्वेशा सुस्थिती त्यास दावी ॥
खंती वाटे जेधवा कींव येई ।
ती मी तेव्हां काव्य रूपांत गाई ॥८॥

स्थायी तूं परमेश हें मम जरी,
ठाऊक आहे खरें ।
लोकांचे अपराध विस्मरुनिया,
त्यांचें कराया बरें ॥
द्यावी शांति सुखायु सर्व जगता,
विज्ञप्ति ही आयका ।
माते सन्मति काव्यशक्ति वितरा,
देवा जगन्नायका ॥ ९ ॥

## प्राप्त स्थितींत समाधान.

ट्रेंच नांवाच्या आंग्ल कवीच्या weep not च्या आधारें.

जहागीर तूझ्या हतातूनि गेली ।
निराशा जरी भूवरी ह्या जहाली ॥
तनू शीणली; सोडि स्नेही जिवाचा ।
नसावा मनीं खेद बापा कशाचा ॥१॥

१६... नं.........
ता.........

जरी मृत्युनें आप्त ओढोनि नेले ।
तुला ह्या जगीं एकटें सोडियेलें ॥
कृती पातकांच्या प्रभू पाहि साचा ।
नसावा मनीं खेद बापा कशाचा ॥२॥

दोष न दे दुसऱ्याला,
प्राप्त स्थिति तीमधें समाधान ॥
मानोनी; प्रभु चरणीं,
भक्ती ठेवी त्यजोनि अभिमान ॥ ३ ॥

---

# मी.

वेडा मी जरि वाटतों,
परि तुह्मां हें सांगतों आयका ।
कोणी यत्न करी,
धनास्तव कुणी स्त्रीकारणानें फुका ॥

ठेवी वाङमय-हेतु जो निज मनीं,
सेवा करावी असें ॥
वाटें त्यास्तव यत्न जो करित त्या,
वेडा ह्मणावें कसें ॥ १ ॥
अथवा राहु विचार हा मज नसे,
चिंता जगाची तरी ।
सोडावें जनहो सुखांत मजला,
ही रीत तुह्मां बरी ॥
आहे जो रसिकाग्रणी जगतिं या,
होईल त्या पारख ॥
काव्यें सेविल तो तदा अनुभवीं,
सत् शांति तैसें सुख ॥ २ ॥
कोणी शुद्ध मनें बघेल कविची,
आहे खरी योग्यता ।
ईशेच्छा प्रतिभेस कारण पहा,
होते जगीं तत्वता ॥

त्या योगें नव काव्य येइ उदया,
प्रज्ञा बहू तोष हो ॥
सूर्यावांचुनि विश्व ह्या कविविणें,
साहित्य तैसें अहो ॥ ३ ॥
काव्यानें मजला पहा सुजनहो,
आनंद होतो अती ।
तेव्हां मी मजला खरा विसरतों,
ती काय वर्णूं स्थिति ॥
ईशानें करुनी कृपा वितरिली,
ही काव्यशक्ती खरी ॥
मिथ्या बोल वदूं नका रसिकहो,
तेणें श्रमे वैखरी ॥ ४ ॥
भाषा ही जननी पवित्र अपुली,
आहे बहु प्रेमला ।
ठेवा लक्ष तिच्यावरी मग नको,
सांगावया तें मला ॥

होती सर्व विचार व्यक्त जगतीं,
योगें जियेच्या पहा ।
ती हो तुष्ट तरी तुह्मीं सुखनिधी,
माजी बुधांनो रहा ॥ ५ ॥

## स्वार्थरहित-कार्यें.

जगांत आह्मीं जीं जीं करितों,
कार्यें स्वार्थ प्रेमें ॥
त्यापेक्षां दुसऱ्यास्तव करितां,
मिळेल सुख बघ नेमें ॥ १ ॥
ह्मणती जन कीं, स्वार्थावांचुनि,
आहे काय जगांत ? ॥
विदित कवीला काय असे तें,
काव्य मिषानें गात ॥ २ ॥

सांगा मजला स्वार्थ प्रेरित,
मातेचें कां ? प्रेम ॥
नसते कां ? प्रभुवरची निष्ठा,
भक्ताची निष्काम ॥ ३ ॥
पतिव्रतेची प्रीति किंवा,
स्नेहाचा जिव्हाळा ॥
असतो कां रे स्वार्थासाठीं,
रसिका सांग कृपाळा ॥ ४ ॥
काव्यें गायन चित्र बघोनी,
हर्षपूर हृदयांत ॥
उद्भवणें हें स्वाभाविक बहु,
तीच जगाची रीत ॥ ५ ॥
बालाचे मृदु बोल परिसुनी,
मोहित होय न ऐसा ॥
पाषाणाचें हृदय ह्मणावें,
मिळे जरी नर सहसा ॥ ६ ॥

अनाथ दुःखी अबला देखुनि,
द्रवें न चित्त जयाचें ॥
दिसेल ऐसा जगांत नर तरि,
पशु त्या समजायाचें ॥ ७ ॥
पक्षांची किलबिल तसें तें,
सुंदर निर्झर गान ॥
परिसुनि ज्यातें हर्ष होइना,
असा असे वद कोण ॥ ८ ॥
देशासाठीं भूपासाठीं,
प्राण त्यजाया सजला ॥
वीर असा कुणि स्वार्थ रहित तो,
मनांत वाटे मजला ॥ ९ ॥
सर्व जगाच्या कल्याणास्तव,
सदा राहती संत ॥
दिव्य विभूती तयांस कोठुनि,
स्वार्थ जगांत पसंत ॥ ११ ॥

क्र. १६८३

रवि शशि आह्मां नित्य दीप हे,
प्रकाश देती नियमें ॥
स्वार्था सोडुनि चालतात ना ?
त्यांचीं येथिल कामें ॥ ११ ॥
जो कविराया जगतीं गातो,
आत्मानंदासाठीं ॥
शिक्षण द्यावें जनतेला कां.
स्वार्थ तयाच्या पाठीं ॥ १२ ॥
ह्या सर्वांचा विचार करुनि,
व्यवहारीं वागावें ॥
कांहीं काळ दुजाचें साठीं,
प्रयत्नास लागावें ॥ १३ ॥
ऐशा कामीं खरा मोद तो,
शिका कसा मिळवावा ॥
स्वार्थ सोडितां कोठुनि कविला,
लागे तो कळवावा ॥ १४ ॥

---

# माझ्या वाचकांस

फुलें खुडुनिया नवीं,
सहज रम्य बागेंतलीं ।
यथामति करोनियां,
कवन-माळ ही वाहिलीं ॥
प्रभो परम मंगला !
हिजमुळें सदां सज्जना ।
मिळो सुख अशी असे,
तव पदीं कवि-प्रार्थना ॥ १ ॥

समाप्त

दा. क्र. १६९३

REFBK-0001693

REFBK-0001693

Printed at the Shri Samarth Press,
Nasik, Raviwar Peth, House No. 318.
by L. R. Karmarkar.
Published by V. N. Vad. 813 Raviwar
Nasik.